स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन
सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, कोल्हापूर
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, कोल्हापूर
कोल्हापूर दु.क्र. 0231-2651318 E-mail:- acswokolhapur@gmail.com

# वसंतराव नाईक तांडा/वस्ती सुधार योजना
# जिल्हास्तरीय समिती बैठक गुरूवार दि. 28/10/2021
# वेळ दु. 2:00 वाजता बैठकीचे इतिवृत्त.

जा. क्र/सआसकको/तांडा/वस्ती/जिल्हास्तरीय समितीबैठक/इतिवृत्त/2021-22 4170 दि: 28.10.2021
9-11

वसंतराव नाईक तांडा/वस्ती सुधार योजना अंतर्गत जिल्हास्तरीय समितीची बैठक मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचे दालनात दि. 28/10/2021 वेळ दु. 2:00 वाजता मा. अध्यक्ष वसंतराव नाईक तांडा/वस्ती सुधार योजना तथा जिल्हाधिकारी कोल्हापूर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

**सदर बैठकीस खालीलप्रमाणे जिल्हास्तरीय समितीतील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.**

| अ.क्र. | सन्माननीय सदस्यांचे नाव | पदनाम/कार्यालयाचे नाव | समितीतील पद |
|---|---|---|---|
| 1 | मा. श्री. राहुल रेखावार | जिल्हाधिकारी, कोल्हापूर | अध्यक्ष |
| 2 | मा. श्री.वि.तु.पाटील | मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर | सदस्य |
| 3 | मा. श्री. एस.जे.भांदुगरे (प्रतिनिधी) | कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जि. प. कोल्हापूर | सदस्य |
| 4 | श्री. विजय पवार | जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर | सदस्य |
| 5 | श्री. बी.व्ही. माने (प्रतिनिधी) | जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जि.प. कोल्हापूर | सदस्य |
| 6 | श्री. सुशील संसारे | गटविकास अधिकारी, पं.स. कागल | सदस्य |
| 7 | श्री. संदीप भंडारे | गटविकास अधिकारी, पं.स. राधानगरी | सदस्य |
| 8 | श्रीमती सरीता पवार | गटविकास अधिकारी, पं.स. भुदरगड | सदस्य |
| 9 | श्री. शरद मगर | गटविकास अधिकारी, पं.स. गडहिंग्लज | सदस्य |
| 10 | श्री. आनंद गजगेश्वर | गटविकास अधिकारी, पं.स. आजरा | सदस्य |
| 11 | श्री. चंद्रकांत बोडरे | गटविकास अधिकारी, पं.स. चंदगड | सदस्य |
| 12 | श्री. अनिल रामचंद्र वाघमारे | गटविकास अधिकारी, पं.स. शाहूवाडी | सदस्य |
| 13 | श्री. तुलशीदास शिंदे | गटविकास अधिकारी, पं.स. पन्हाळा | सदस्य |
| 14 | श्रीम. डॉ. शबाना मोकाशी | गटविकास अधिकारी, पं.स. हातकणंगले | सदस्य |
| 15 | श्रीम. माधुरी परीट | गटविकास अधिकारी, पं.स. गगनबावडा | सदस्य |
| 16 | श्री. शंकर कवितके | गटविकास अधिकारी, पं.स. शिरोळ | सदस्य |
| 17 | श्री. जयवंत उगले | गटविकास अधिकारी, पं.स. करवीर | सदस्य |
| 18 | श्री. विशाल लोंढे | सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कोल्हापूर | सदस्य सचिव |



Scanned with CamScanner

बैठकीच्या सुरुवातीस सर्वप्रथम मा. अध्यक्षांचे वतीने व समाज कल्याण विभागाच्या वतीने श्री. विशाल लोंढे सदस्य सचिव यांनी उपस्थितांचे स्वागत करून अध्यक्षांच्या अनुमतीने बैठकीची सुरूवात करण्यात आली.

समितीचे सदस्य सचिव श्री. विशाल लोंढे यांनी वसंतराव नाईक तांडा/वस्ती सुधार योजनेचा शासन निर्णय दि. 30.01.2018 चे वाचन केले. सदर शासन निर्णयानुसार विमुक्त जाती व भटक्या जमातीतील समाजातील तांडा/वस्त्यांमध्ये विविध पायाभूत सुविधांची कामे करणे व सदर योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी तालुकास्तरीय समिती कडून प्राप्त झालेल्या बृहत आराखड्याला मान्यता घेणे व प्रस्तावांबाबत चर्चा करणे इ. बाबत बैठकीचे नियोजन करण्यात आले असलेचे सांगितले. तसेच तालुकास्तरीय समिती कडून प्राप्त झालेल्या बृहत आराखड्याला मंजुरी देऊन जिल्हास्तरीय समितीमार्फत शासनास पाठवायचे असलेचे समितीचे सदस्य सचिव यांनी सांगितले.

तालुकास्तरीय समितीने तयार केलेले बृहतआराखडे कसे बनविले आहेत याबाबत मा.अध्यक्ष यांनी विचारले असता श्री. भंडारे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, राधानगरी यांनी सदरचे बृहतआराखडे ग्रामसेवक यांचेकडून माहिती प्राप्त करुन घेवून सादर करण्यात आली आहे असे सांगितले. विमुक्त जाती व भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग मधील रहिवाशी लोकांची जातीनिहाय माहिती उपलब्ध आहे का? असे विचारले असता,सदर माहिती उपलबध नसलेचे सर्व सदस्यांनी सांगीतले. त्यानुषंगाने मा.अध्यक्ष यांनी सदर जातींची यादी जनगणना विभाग, कोल्हापूर अथवा सामाजिक, आर्थिक जातनिहाय जनगणनेकडून (SECC) उपलब्ध करुन घेण्याबाबत सूचना देण्यात आली.

सदस्य सचिव यांनी वसंतराव नाईक तांडा/वस्ती सुधार योजनेमध्ये दलित वस्ती सुधारणा योजनेच्या धर्तीवर तांडा/वस्ती सुधार योजना सुधारीत करण्याबाबतचा विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग कल्याण विभागाचा शासन निर्णय क्र. तांसुयो-2017/प्र.क्र.-84/विजाभज-1 दि. 30 जानेवारी 2018 नुसार अंमलबजावणी करावयाची असलेबाबत सदस्य सचिव यांनी समितीस सांगितले. मा. अध्यक्ष यांनी सन 2020-21 ते 2024-25 चे बृहत आराखड्यामधील नमूद कामे ही पुढील 5 वर्षात पुर्ण होणार नाहीत अशी शंका उपस्थित केली. त्यावर प्रस्तूत कामे ही पुढील 5 वर्षाच्या कालमर्यादेपर्यंतच करावयाची आहेत असे सर्व गटविकास अधिकारी यांनी सांगीतले.

मा.अध्यक्ष यांनी प्राप्त झालेले बृहत आराखडे हे ग्रामपंचायत ठरावातून आलेले आहेत का? असे विचारले असता सर्व गटविकास अधिकारी यांनी बृहत आराखड्यांतील कामे ग्रामसेवकांमार्फत सर्वे करून ग्रामपंचायतींच्या ठरावाने सादर केले असलेचे सांगीतले. तसेच या योजनेचा ग्रामस्तरावर लाभ मिळणेकामी मतदान सर्वेक्षण धर्तीवर विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील तांडा/वस्ती निहाय व कुटूंबनिहाय माहिती ग्रामसेवकांमार्फत संकलित करावी. व पुन:श्च त्याची यादी बनवून गटविकास अधिकारी यांनी अहवाल जिल्हास्तरीय समितीस सादर करणेबाबत सूचित केले.

मा. अध्यक्ष यांनी विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग कल्याण विभागाचा शासन निर्णय क्र.तांसुयो-2017/प्रक्र-84/विजाभज-1 दि. 19 जानेवारी 2019 च्या शासन निर्णयातील निर्देशांनुसार प्राधान्यक्रम ठरविणे अपेक्षित असल्याचे सांगीतले. त्याचप्रमाणे ग्रामपंचायतींकडून कामांचे प्रस्ताव घेण्यात यावे असे सांगीतले. सदर योजनेकरिता निधीच्या उपलब्धतेबाबत कोणतेही उद्दिष्ट नसून जिल्हास्तरीय समितीमार्फत शासनाकडे सादर करण्यात येणाऱ्या परिपूर्ण प्रस्तावांना शासन स्तरावर प्रशासकिय मान्यता व निधी प्राप्त होतो असे सदस्य सचिव यांनी समितीच्या निदर्शनास आणून दिले.

मा. अध्यक्ष यांनी सदरचे बृहत आराखडे सुधारीत करून 15 नोव्हेंबर पर्यंतच्या कालमर्यादेत समितीकडे सर्व गटविकास अधिकारी यांनी सादर करण्याबाबत सूचित केले. तसचे बृहत आराखडे सुधारीत करून देणेबाबत सर्व गटविकास अधिकारी यांनी संबंधित ग्रामपंचायतींना पत्र देणेविषयी सूचना दिली. त्याचबरोबर या योजनेचा लाभ देणेकरिता सदर प्रवर्गात येणाऱ्या जातींची यादी संबंधीत तालुक्यामधील तहसिलदार कार्यालयातील



Scanned with CamScanner

जातीच्या दाखलेबाबत काम पाहणाऱ्या कर्मचा-याकडून प्राप्त करुन घेणेबाबत ग्रामसेवकांना सूचीत करावे असे सांगीतले.

बैठकीत देण्यात आलेल्या सर्व सुचनांची पुर्तता करुन पुढील बैठकीत परिपूर्ण माहिती सादर करण्याचे मा. अध्यक्ष यांनी समितीस सांगीतले.

शेवटी उपस्थित समितीतील सदस्यांचे आभार मानून मा. अध्यक्षांच्या सहमतीने बैठकीची सांगता करण्यात आली.

**सदस्य सचिव**

वसंतराव नाईक तांडा/वस्ती सुधार योजना

जिल्हास्तरीय समिती तथा

सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण कोल्हापूर

10/11
09/11/21

**अध्यक्ष**

वसंतराव नाईक तांडा/वस्ती सुधार योजना

जिल्हास्तरीय समिती तथा

जिल्हाधिकारी, कोल्हापूर

प्रत :-

1. मा.संचालक विमुक्त जाती भटक्या जाती ,इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग,महाराष्ट्र राज्य,पुणे. यांना सविनय सादर
2. मा.प्रादेशिक उपायुक्त,समाज कल्याण , पुणे विभाग, पुणे.

---

जा.क्र.सआसकको/तांवसु/बैठक इति/4192 दिनांक - 03/11/2021 (10)

प्रति,

----------------

----------------

-----------------

आपणांस कळविणेत येते की , उपरोक्त इतिवृत्तामध्ये आपणांशी संबंधित मुद्यांबाबत उचित कार्यवाही करून तात्काळ कार्यपूर्तता अहवाल सादर करावा.

**(विशाल अ. लोंढे)**
**सहाय्यक आयुक्त,**
**समाज कल्याण, कोल्हापूर**



Scanned with CamScanner